24 APR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष

…वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एआयमुळे कामाची गती वाढली, पण सत्याची कास धरावी : प्रवीण टाके

## पीआरएसआय कोल्हापूर चॅप्टरचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या कोल्हापूर चॅप्टरचे उद्घाटन प्रवीण टाके यांनी रोपट्यास पाणी घालून केले. यावेळी डॉ. नीशा मुडे, डॉ. रवींद्र चिंचोलकर, अंकुश चव्हाण, विश्वजीत भोसले उपस्थित होते.

**कोल्हापूर :** कोरोना साथीनंतर जनसंपर्क क्षेत्राचे महत्त्व वाढले असले तरी विश्वासार्हता टिकवणे अत्यावश्यक आहे. एआय साधनांमुळे कामाची गती वाढते. मात्र, कोणत्याही परिस्थितीत सत्य आणि नैतिकता जपणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी मंगळवारी केले.

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या (पीआरएसआय) कोल्हापूर चॅप्टरच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला. यावेळी त्यांनी पीआरएसआय कोल्हापूर चॅप्टरचे अधिकृत उद्घाटन झाल्याची घोषणा केली. प्रा. डॉ. निशा मुडे-पवार अध्यक्षस्थानी होत्या.

यावेळी दक्षिण कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण, सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर, सचिव विश्वजीत भोसले, कोषाध्यक्ष सचिन मोरे उपस्थित होते.

डॉ. चिंचोलकर म्हणाले, "जनसंपर्क आणि सत्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एआयच्या युगात माहितीची सत्यता पडताळणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. प्रॉम्प्ट ट्रेनिंगमुळे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात."

अंकुश चव्हाण यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला जनसंपर्क व माध्यम क्षेत्रातील व्यावसायिक, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. अनुराधा इनामदार आणि डॉ. चंद्रशेखर वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले.

24 APR 2026

सकाळ

# तीन दिवस आधी मिळणार 'हॉल तिकीट'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेच्या तीन दिवस आधी परीक्षार्थींना हॉल तिकीट (प्रवेशपत्र) मिळणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांमध्ये शिकविल्या जाणाऱ्या एम.एस्सी. आणि तत्सम अभ्यासक्रम तसेच विद्यापीठ अधिविभागांकडील ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा आहे, अशा अभ्यासक्रमांच्या भाग एकच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्याची मुदत २७ एप्रिल आणि ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा नाही, अशा अभ्यासक्रमांसाठी ३१ मेपर्यंत मुदत आहे. प्रवेश परीक्षा १२ ते १५ मेदरम्यान होणार आहेत. विद्यापीठात नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या सीमाभागातील विद्यार्थ्यांकरीता विशेष सवलत देण्यात येत असल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

24 APR 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. श्रीकृष्ण महाजन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे अभ्यासक होते

## – प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता आणि वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे गाढे अभ्यासक होते. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि सामाजिक समावेशन केंद्रास त्यांनी भरीव योगदान दिले, अशी भावना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे अपघातामुळे निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. जाधव बोलत होत्या.



प्रभारी प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव म्हणाल्या, मागील काही वर्षांपासून फुले, शाहू, आंबेडकर यांचा सप्ताह विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात येतो. यामध्ये प्रामुख्याने डॉ. महाजन यांचा मोठा सहभाग होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शिकवण खऱ्या अर्थाने अंगी बाणावलेले एक शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती. विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यावर त्यांचा भर होता.

वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे डॉ. केदार मारूलकर म्हणाले, सकारात्मक विचार करताना विद्यार्थी आणि विद्यापीठ हीत यांचा कायम डॉ. महाजन विचार करीत असत. भविष्यातील शैक्षणिक सुधारणांबाबत ते नेहमी काळाच्या पुढे जाऊन विचार करीत.

यावेळी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, नॅक विभागाचे डॉ. सागर डेळेकर, इतिहास माजी अधिविभागप्रमुख डॉ. माधो पाटील, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. उदय पाटील, एमबीए अधिविभागप्रमुख डॉ. दीपा इंगवले, रसायनशास्त्र अधिविभागाचे डॉ. गोविंद कोळेकर, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागप्रमुख डॉ. पवन गायकवाड, डॉ. मुरलीधर भानारकर, डॉ. किशोर खिलारे, कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष आनंदराव खामकर, उपकुलसचिव निवास माने, संशोधक विद्यार्थी यांनी शोकभावना व्यक्त केल्या. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन केंद्राचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, डॉ. अवनिश पाटील, डॉ.निशा मुढे, डॉ.राजेंद्र सोनकवडे, लेखा विभागाचे उपकुलसचिव प्रिया देशमुख उपस्थित होते.

2 4 APR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा फुले, महर्षी शिंदे यांच्या विचारात परिवर्तनाची सलग परंपरा

## डॉ. राजन गवस : फुले,शिंदे जयंती निमित्त विद्यापीठात एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

**जनप्रवास : कोल्हापूर**

महात्मा ज्योतीराव फुले आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे स्वतंत्र काळातील असले तरी त्यांच्या विचारांमध्ये समाजपरिवर्तनाची एक सलग परंपरा दिसून येते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. राजन गवस यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन यांच्या वतीने महात्मा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष आणि महर्षी शिंदे यांची १५३ वी जयंती या संयुक्त निमित्ताने "महात्मा फुले आणि महर्षी शिंदे:अनुबंधांचा अन्वयार्थ" या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले होते. त्या चर्चासत्राचे उद्घाटक म्हणून डॉ. गवस बोलत होते.

डॉ. गवस म्हणाले, महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांची कार्यपद्धती व अनुभव वेगवेगळे असले तरी दोघांचाही केंद्रबिंदू सामाजिक विषमता दूर करणे हा होता. फुले यांनी जातिव्यवस्था, कर्मविपाक सिद्धांत आणि अवतार संकल्पना यांना ठामपणे विरोध करत "सत्य" हा धर्म मानला आणि समाजाला पर्यायी मूल्यव्यवस्था दिली. त्यांनी थेट अन्यायावर प्रहार करत समाजजागृती केली. तर,महर्षी शिंदे यांनी अध्यात्म आणि सामाजिक सुधारणांचा समन्वय साधत जीवनाभिमुख अध्यात्माचा पुरस्कार केला. फुले यांच्या काळातील सामाजिक जखमा, अपमान आणि अन्याय यांचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता, तर शिंदे यांचा प्रवास तुलनेने वेगळा होता. तरीही शिंदे यांनी धर्माचा अभ्यास करून समाजातील विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न केले. त्या काळात हिंदू धर्मावर विविध बाह्य प्रभावांचा दबाव असताना फुले यांनी "सत्यधर्म" मांडला, तर शिंदे यांनी प्रार्थना समाजासारख्या चळवळींतून सुधारणा घडवून आणण्याचा मार्ग स्वीकारला.

ते पुढे म्हणाले, फुले आणि शिंदे यांच्या विचारांचा अनुबंध समजून घेताना त्यांच्या काळाचा संदर्भ लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. दोघांनीही समाजाला नवीन विचार दिले,परंतु त्यांची पद्धत आणि दृष्टिकोन वेगळा होता. या दोन्ही प्रवाहांचा एकत्रित विचार केल्यास महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांची व्यापक परंपरा अधिक स्पष्ट होते, असेही डॉ. गवस यांनी अधोरेखित केले.

यावेळी पुण्याच्या प्रा. सुशील धसकटे यांचे बीजभाषण झाले. त्यांनी सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील या दोन विचारवंतांच्या कार्यातील परस्परसंबंध अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने उलगडून दाखवला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, समताधारित समाजनिर्मितीसाठी काम करणाऱ्या सर्व महामानवांचा एकत्रित, संतुलित असा अभ्यास साकल्याने करण्याची आजघडीला गरज आहे..

सुरवातीला महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या प्रतिमांना मान्यवरांनी अभिवादन केले. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या निधनाबद्दल त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला, तर प्रांजली क्षीरसागर यांनी आभार मानले.

कार्यक्रमास डॉ. भारतभूषण माळी, अवनीश पाटील, अक्षय सरवदे, सुखदेव उंदरे, दत्तात्रय मचाले आदी उपस्थित होते.




**कोल्हापूर : चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात बोलताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस. डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. सुशील धसकटे, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि डॉ. रणधीर शिंदे.**

### चर्चासत्राचा समारोप

दुपारच्या पहिल्या सत्रात 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या कार्याचा अन्वयार्थ'या विषयावरील चर्चेत उद्धव धुमाळ (पुणे), डॉ. प्रकाश पवार आणि रमेश चव्हाण (पुणे) यांनी सहभाग घेतला. डॉ. नंदकुमार मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दुसऱ्या सत्रात'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या कार्याचा सामाजिक - सांस्कृतिक अनुबंध'या विषयावरील चर्चेत डॉ. भक्ती महाजन (गोवा), डॉ. सुरेश शिखरे, मोहसीन पठाण यांनी सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. शंकरराव कदम (कराड) यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चासत्राचा समारोप झाला.

24 APR 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या शाश्वत शेती परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग व भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी दि. २४ रोजी एकदिवसीय परिषदेचे आयोजन केले असल्याची माहिती यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. निंतीन माळी यांनी दिली. शेतकऱ्यांची उत्पन्नवाढ, शेतीची शाश्वतता व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने 'शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी" या विषयावर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. ही शिवाजी परिषद विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणार असल्याचे डॉ. माळी यांनी सांगितले. या परिषदेत शाश्वत शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पद्धती, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पर्यायी पीक पद्धतींचा अवलंब, सेंद्रिय शेतीचे महत्त्व, जलसंधारणाचे उपाय यावर मार्गदर्शन केले जाणार आहे. कृषी प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून मूल्यवर्धन, उत्पादनाचे ब्रँडिंग, पॅकिजिंग आणि बाजारपेठेतील संधी याविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाईल. ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून पूरक व्यवसाय, लघुउद्योग, घरगुती उत्पादन आणि उद्योजकतेच्या संधी यावर विशेष सत्र आयोजित केले आहे. परिषदेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, कृषी अधिकारी, अनुभवी प्रगतशील शेतकरी मार्गदर्शन करणार आहेत. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 APR 2026
सकाळ

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे गाढे अभ्यासक हरपले

## प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना विद्यापीठात आदरांजली

कोल्हापूर, ता. २३ : 'वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या निधनामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे शिवाजी विद्यापीठातील गाढे अभ्यासक हरपले आहेत. विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यावर त्यांचा भर होता', अशी भावना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आज येथे व्यक्त केली.

डॉ. महाजन यांना आदरांजली वाहण्यासाठी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या शोकसभेत त्या बोलत होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शिकवण खऱ्या अर्थाने अंगी बाणवलेले एक शिक्षक म्हणून डॉ. महाजन यांची ओळख होती. विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यावर त्यांचा भर होता. त्यांच्या निधनामुळे विद्यापीठासह समाज, शैक्षणिक क्षेत्राची न भरून येणारी हानी झाली असल्याची भावना डॉ. जाधव यांनी व्यक्त केली. डॉ. केदार मारुलकर यांनी सकारात्मक विचार करताना विद्यार्थी आणि विद्यापीठ हिताचा कायम डॉ. महाजन विचार करीत असल्याची आठवण सांगितली.

या सभेत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. डॉ. रामचंद्र पवार, सागर डेळेकर, माधो पाटील, उदय पाटील, दीपा इंगवले, गोविंद कोळेकर, पवन गायकवाड, मुरलीधर भानारकर, किशोर खिलारे, आनंदराव खामकर, निवास माने यांनी शोकभावना व्यक्त केल्या. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, शरद बनसोडे, अवनीश पाटील, निशा मुढे, राजेंद्र सोनकवडे, प्रिया देशमुख, आदी उपस्थित होते.

कोल्हापूर
2 4 APR 2026
सकाळ

# महात्मा फुले, महर्षी शिंदे यांनी दिले समाजाला नवे विचार

## राजन गवस : विद्यापीठात मराठी विभागातर्फे चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २३ : 'महात्मा ज्योतीराव फुले आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे स्वतंत्र काळातील असले, तरी त्यांच्या विचारांमध्ये समाजपरिवर्तनाची एक सलग परंपरा दिसून येते. दोघांनीही समाजाला नवीन विचार दिले. या दोन्ही प्रवाहांचा एकत्रित विचार केल्यास महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांची व्यापक परंपरा अधिक स्पष्ट होते', असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महात्मा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष व महर्षी शिंदे यांची १५३ वी जयंती या संयुक्त निमित्ताने 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे : अनुबंधांचा अन्वयार्थ' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र झाले. त्याच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. गवस बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. पुण्याच्या प्रा. सुशील धसकटे यांचे बीजभाषण झाले. त्यांनी सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील या दोन विचारवंतांच्या कार्यातील परस्परसंबंध अभ्यासपूर्ण पद्धतीने उलगडून दाखवला. धसकटे यांनी पुणे शहराच्या सामाजिक-सांस्कृतिक संदर्भातून या अनुबंधाचा वेध घेतला. यावेळी डॉ. भारतभूषण माळी, अवनीश पाटील, अक्षय सरवदे,




चर्चासत्रात बोलताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस.

सुखदेव उंदरे, दत्तात्रय मचाले आदी उपस्थित होते. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी आभार मानले. दरम्यान, चर्चासत्रात उद्धव धुमाळ, डॉ. प्रकाश पवार, रमेश चव्हाण, भक्ती महाजन, सुरेश शिखरे, मोहसीन पठाण, प्राचार्य डॉ. शंकरराव कदम यांनी विचार मांडले.